केसरी
१५ जानेवारी २०२०



राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार उपजिल्हाधिकारी संजय शिंदे यांचे हस्ते स्वीकारताना प्रा. संदीप पाटील व इतर मान्यवर.

# प्रा. संदीप पाटील आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

कोल्हापूर : प्रतिनिधी

विवेकानंद कॉलेजमधील अर्थशास्त्राचे प्राध्यापक संदीप रामगोंडा पाटील यांचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देवून गौरव करण्यात आला. कोल्हापूरचे उपजिल्हाधिकारी संजय शिंदे यांचे हस्ते हा पुरस्कार मिळाला. यावेळी पोलीस उपअधीक्षक मा.शिवाजीराव जमदाडे, मा. महादेव नरुटे, सुरेश माडकर, शिवाजी पाटील उपस्थित होते. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ एस वाय होनगेकर. एन.एस.एस. विभाग प्रमुख प्रा. एच. पी. पाटील, प्रा एस. एम. रुईकर व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले.

केसरी
१६ मार्च २०२०/१०

# स्वच्छता मोहिमेत ५ टन कचरा एकत्र

कोल्हापूर : प्रतिनिधी

शहरामध्ये रविवारी झालेल्या महास्वच्छता अभियानामध्ये ५ टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आला. या मोहिमेचा ४६ वा रविवार असून या अभियाना मध्ये शहरातील ज्येष्ठ नागरिक, उज्ज्वल कोल्हापूर ग्रुप, विवेकानंद कॉलेजचे एन.एस.एस.चे विद्यार्थी, डी. डी. शिंदे सरकार कॉलेज के. जी.आंबुलगेकर व एन.सी.सी. विद्यार्थी विद्यार्थिनी, वृक्षप्रेमी ऑर्गनायझेशन संस्था, अमित साखरे युवामंच संस्थेचे कार्यकर्ते, स्वरा फौंडेशनचे प्रमोद माजगावकर व कार्यकर्ते, स्वच्छतादूत अमित देशपांडे व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला. ही मोहीम आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.



शहरामध्ये रविवारी झालेल्या महास्वच्छता अभियानामध्ये ५ टन कचरा व प्लास्टिक महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी गोळा केला.

यावेळी आयुक्तांनी कोरोनाबाबत दक्षता घ्यावी, सर्वांनी वारंवार हात स्वच्छ साबणाने धुवावे, सकस व ताजे अन्न घ्यावे, आजारी व्यक्तींनी घरीच थांबावे, गर्दीमध्ये जाऊ नये, डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, अफवांवर कोणीही विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले.

यावेळी कसबा बावडा भाजी मार्केट येथे कोरोनाबाबत नागरिकांन मध्ये प्रबोधन महापालिकेच्यावतीने करण्यात येत होते. यावेळी मार्केटमध्ये सर्वांना कोरोना जनजागृतीबाबत माहितीपत्रक वाटण्यात आले.

तीन जेसीबी, ६ डंपर, ६ आरसी गाड्या व महापालिकेच्या १३० स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने राबविण्यात आली. यावेळी उपायुक्त निखील मोरे, आरोग्याधिकारी डॉ.रमेश जाधव, शहर उप अभियंता बाबूराव दबडे, शाखा अभियंता आर. के. पाटील, मुख्य अग्निशमन अधिकारी रणजित चिले, परवाना अधीक्षक राम काटकर, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, सर्व आरोग्य निरीक्षक, कर्मचारी व नागरिक यांनी सहभाग नोंदविला.

केसरी
बुधवार, ४ मार्च २०२०



स्वच्छता अभियानामध्ये सहभागी शहरातील ज्येष्ठ नागरिक, स्वरा फौंडेशनचे कार्यकर्ते, स्वच्छतादूत अमित देशपांडे, विवेकानंद कॉलेजचे एन. एस. एस. चे विद्यार्थी, वृक्षप्रेमी ऑर्गनायझेशन संस्था, धर्माधिकारी प्रतिष्ठान संस्थेचे कार्यकर्ते आदी.

# महास्वच्छता अभियानात ६ टन कचरा, प्लास्टिक गोळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शहरामध्ये रविवारी झालेल्या महास्वच्छता अभियाना मध्ये ६ टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. या अभियानामध्ये शहरातील ज्येष्ठ नागरिक, स्वरा फौंडेशनचे कार्यकर्ते, स्वच्छतादूत अमित देशपांडे, विवेकानंद कॉलेजचे एन. एस. एस. चे विद्यार्थी, वृक्षप्रेमी ऑर्गनायझेशन संस्था, धर्माधिकारी प्रतिष्ठान संस्थेचे कार्यकर्ते व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

यावेळी वृक्षप्रेमी ऑर्गनायझेशन संस्थेकडून पर्यावरणपूरक संदेश देणाऱ्या पाणपोईचे अनावरण आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. ऑर्गनायझेशन संस्थेकडून अविरत जलसेवा देण्याचे या संस्थेचे अकरावे वर्ष असून त्यांच्या या उपक्रमाबद्दल आयुक्तांनी कौतुक केले. यावेळी या संस्थेने पंचगंगा नदी घाट परिसरातील १८० झाडांना पाणी घालणे; तसेच त्या ठिकाणची साफसफाई केली.

या मोहिमेत गांधी मैदान, पंचगंगा नदी घाट, रियालन्स मॉल संपूर्ण परिसर, जयंती नदी पंपिंग स्टेशन, हुतात्मा पार्क; तसेच डायाना पार्क येथील चॅनल सफाई व स्वच्छता करण्यात आली. ही मोहीम ५ जेसीबी, ६ डंपर, ६ आरसी गाड्या, १ ट्रॅक्टर व महापालिकेच्या ७० स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने राबविण्यात आली.

यावेळी आरोग्यधिकारी डॉ. दिलीप पाटील, शाखा अभियंता आर. के. पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, विवेकानंद कॉलेज एन. एस. एस. चे विद्यार्थी, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, सर्व आरोग्य निरीक्षक, कर्मचारी व नागरिकांनी सहभाग नोंदविला.

लोकमत कोल्हापूर, सोमवार, दि. ९ मार्च २०२०

# सात टन कचरा, प्लास्टिक उठाव

## महास्वच्छता अभियान : सामाजिक संघटना, ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग

**कोल्हापूर :** महास्वच्छता अभियानामध्ये सात टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. मोहिमेचा हा ४५ वा रविवार होता. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

यावेळी उपायुक्त निखिल मोरे, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, उप शहर अभियंता हर्षजित घाटगे, शाखा अभियंता आर. के. पाटील, मुख्य अग्निशमन अधिकारी रणजित चिले, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, स्वरा फौंडेशनचे प्रमोद माजगावकर, विवेकानंद कॉलेज एन. एस. एस.चे विद्यार्थी, स्वच्छता दूत अमित देशपांडे, आदी उपस्थित होते.



महापालिकेच्यावतीने रविवारी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. विविध सामाजिक संस्थेच्या पुढाकाराने जयंती नाला येथील स्वच्छता करण्यात आली.

**तीन डंपर प्लास्टिक :** तपोवन ग्राऊंड, गांधी मैदान, पंचगंगा नदी घाट, रिलायन्स मॉल संपूर्ण परिसर, जयंती नदी पंपिंग स्टेशन, हुतात्मा पार्क तसेच कमला कॉलेज, उषाराजे हायस्कूल ग्राउंडची सफाई, टाकाळा येथील चॅनल सफाई, जयंती नदी संप व पंप हाऊस बंधारा येथील तीन डंपर प्लास्टिक उठाव करण्यात आला.

**महापालिकेची यंत्रणा**

४ जेसीबी, ५ डंपर, ६ आरसी गाड्या व महापालिकेचे १५० कर्मचारी

लोकमत कोल्हापूर, सोमवार, दि. २ मार्च २०२०

# सहा टन कचरा, प्लास्टिकचा उठाव

## महास्वच्छता अभियान : सामाजिक संस्था, ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शहरामध्ये रविवारी महास्वच्छता अभियानात ६ टन कचरा व प्लास्टिक गोळा केले. मोहिमेचा ४४ वा रविवार असून, सामाजिक संस्था, ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली मोहीम झाली.

यावेळी वृक्षप्रेमी आर्गनायझेशन संस्थेकडून पर्यावरणपूरक संदेश देणाऱ्या पाणपोईचे अनावरण आयुक्त डॉ. कलशेट्टी यांच्या हस्ते झाले. या संस्थेने पंचगंगा नदीघाट परिसरातील १८० वृक्षांना पाणी घालण्यात आले. यावेळी स्वरा फौंडेशन, स्वच्छता दूत अमित देशपांडे, विवेकानंद कॉलेजचे एन. एस. एस.चे विद्यार्थी, धर्माधिकारी प्रतिष्ठान या संस्था मोहिमेत सहभागी होत्या. दरम्यान, सी.पी.आर. हॉस्पिटल येथे आयुक्तांनी स्वच्छतेची शपथ देऊन मोहिमेला सुरुवात केली. यावेळी आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, शाखा अभियंता आर. के. पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, विवेकानंद कॉलेज एन.एस.एस.चे विद्यार्थी, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, सर्व आरोग्य निरीक्षक, कर्मचारी व नागरिक यांनी सहभाग नोंदविला.



महापालिकेच्या स्वच्छता मोहिमेमध्ये जयंती नाल्याची स्वच्छता केली.

### स्वच्छता केलेला परिसर

गांधी मैदान, पंचगंगा नदी घाट, रियालन्स मॉल संपूर्ण परिसर, जयंती नदी पंपिंग स्टेशन, हुतात्मा पार्क, डायना पार्क.

### महापालिकेची यंत्रणा

५ जेसीबी, ६ डंपर, ६ आरसी गाड्या, १ ट्रॅक्टर व महापालिकेचे ७० स्वच्छता कर्मचारी.

लोकमत कोल्हापूर, सोमवार, दि. १६ मार्च २०२०

**पाच टन कचरा उठाव : भीती डावलून नागरिकांसह स्वयंसेवी संस्थांचा मोहिमेत सहभाग**

# महास्वच्छता मोहिमेतून 'कोरोना'ची जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'कोरोना'चे सावट असतानाही रविवारी महापालिकेच्यावतीने महास्वच्छता अभियानात खंड पाडला नाही. दिवसभरात पाच टन कचरा, प्लास्टिक उठाव करण्यात आला. याचबरोबर परिसरात कोरोनाविषयी जनजागृतीही केली. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली असा दुहेरी उपक्रम राबविण्यात आला. सलग ४६ व्या रविवारी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

शहरातील ज्येष्ठ नागरिक, उज्ज्वल कोल्हापूर ग्रुप, विवेकानंद कॉलेज, डी. डी. शिंदे सरकार कॉलेजचे एनसीसी विद्यार्थी, वृक्षप्रेमी ऑर्गनायझेशन संस्था, अमित साखरे युवा मंच संस्थेचे कार्यकर्ते, स्वरा फौंडेशनचे प्रमोद माजगावकर व कार्यकर्ते, स्वच्छता दूत अमित देशपांडे व मनपाचे अधिकारी, सफाई कर्मचारी स्वच्छता मोहिमेत सहभागी होते.



महापालिकेच्या स्वच्छता मोहिमेमध्ये रविवारी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मास्क घालूनच पशुवैद्यकीय प्रशिक्षण केंद्र परिसराची स्वच्छता करण्यात आली.

## ५४० झाडांना पाणी, औषध फवारणी

वृक्षप्रेमी आर्गनायझेशन संस्था व महापालिकेच्यावतीने टाकाळा, राजारामपुरी, रेल्वे फाटक, फुलेवाडी, रंकाळा, पंचगंगा नदी, लक्ष्मीपुरी, शाहूपुरी, प्रतिभानगर, सुभाषरोड, ट्रॅफिक ऑफिस, जयंती पंपिंग स्टेशन परिसर येथील ५४० झाडांना पाणी घालून, औषध फवारणी केली.

## गर्दीमध्ये जाऊ नका : आयुक्त

- 'कोरोना व्हायरस'बाबत दक्षता घ्यावी, वारंवार हात साबणाने स्वच्छ धुवावेत, सकस व ताजे अन्न घ्यावे, आजारी व्यक्तींनी घरीच थांबावे, गर्दीमध्ये जाऊ नये, डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, अफवांवर कोणीही विश्वास ठेवू नये, असे आवाहन आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले.
- यावेळी कसबा बावडा भाजी मार्केट येथे कोरोना व्हायरसबाबत नागरिकांमध्ये प्रबोधन करण्यात आले. मार्केटमध्ये सर्वांना कोरोना जनजागृतीबाबत माहितीपत्रक वाटण्यात आली.

## महापालिकेची यंत्रणा

३ जेसीबी, ६ डंपर, ६ आरसी गाड्या व महापालिकेचे १३० स्वच्छता कर्मचारी.



## स्वच्छता केलेला परिसर

इराणी खण, सिद्धिविनायक हॉस्पिटल, रिलायन्स मॉल संपूर्ण परिसर, दसरा चौक ते खानविलकर पेट्रोल पंप, पंचगंगा नदी घाट, अॅस्टर आधार हॉस्पिटलनजीक, हुतात्मा पार्क, पितळी गणपती ते धैर्यप्रसाद हॉल चौक, कावळा नाका ते रुईकर कॉलनी रोड तसेच संभाजीनगर रोड.

## जयंती नाल्यातून दोन डंपर प्लास्टिक उठाव

जयंती नदी संप व पंप हाऊस बंधारा येथील सांडपाण्यावर तरंगणारे दोन डंपर प्लास्टिक काढण्यात आले.

## झाडांवरील फलक हटविले

स्वच्छता मोहिमेवेळी १४० झाडांवरचे जाहिरात फलक, मोळे, डिजिटल बॅनर हटविले.

लोकमत कोल्हापूर, सोमवार, दि. ६ जानेवारी २०२०

## शहरात स्वच्छता मोहीम : नऊ टन कचरा, प्लास्टिक उचलले : लोकसहभाग वाढला

# महापालिकेची सलग ३६ व्या रविवारी मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महापालिकेतर्फे रविवारी शहरात आयोजित केलेल्या महास्वच्छता अभियानामध्ये नऊ टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. या मोहिमेचा सलग ३६ वा रविवार होता. मोहिमेत ज्येष्ठ नागरिक, मंगळवार पेठ फुटबॉल क्लबचे खेळाडू, स्वरा फौंडेशनचे कार्यकर्ते, विवेकानंद कॉलेज, यशवंतराव चव्हाण कॉलेजचे प्रिन्सिपल, विद्यार्थी -विद्यार्थिनी, कोल्हापूर शहर परीट समाज कार्यकर्ते, स्वच्छता दूत अमित देशपांडे व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी या मोहिमेत सहभाग नोंदविला.

शाहू उद्यान येथे स्वरा फौंडेशनचे कार्यकर्ते व नागरिक यांना स्वच्छतेची शपथ देऊन स्वच्छता मोहिमेस प्रारंभ केला. फौंडेशनतर्फे वृक्षारोपण करण्यात आले.



कोल्हापूर महापालिकेतर्फे सलग ३६ व्या रविवारी आयोजित केलेल्या स्वच्छता मोहिमेत शहरातील वरुणतीर्थ वेश गांधी मैदानाची स्वच्छता केली.

महिन्यातून एकदा स्वच्छता मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे, प्लास्टिकचा वापर करु नका व इतरांनाही करु देऊ नका, असे आवाहन आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले.

यावेळी हॉकी स्टेडियम, दसरा चौक ते खानविलकर पेट्रोल पंप, माळकर तिकटी ते शिवाजी मार्केट, रंकाळा टॉवर ते फुलेवाडी, सायबर चौक ते शेंडा पार्क, उड्डाण पूल ते कावळा नाका, संभाजीनगर ते कळंबा जेलपर्यंत, डीएसपी ऑफिस ते भगवा चौक मेनरोड, कोटीतीर्थ तलाव, गांधी मैदान, शुक्रवार पेठ, गायकवाड, पद्माराजे शाळा, माळकर तिकटी या परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

आपला परिसर स्वच्छ ठेवावा, नागरिकांनी प्लास्टिकचा वापर पूर्णपणे बंद करावा, असे आवाहन करत महालक्ष्मी मंदिर, एन. सी. सी. ऑफिस परिसर, गजानन महाराजनगर, शहर कृती समिती, इत्यादी ठिकाणी स्वच्छता मोहिमेदरम्यान जनजागृती करण्यात येत होती. गटनेता सुनील पाटील, नगरसेवक शेखर कुसाळे, किरण नकाते, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, प्राध्यापक नागावकर, व्ही. एम. पाटील, एच. जी. कांबळे, शाखा अभियंता आर. के. पाटील, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, शशिकांत भालकर, सचिन मोहिते, आदित्य लातूरकर, प्रशांत शेंडे, विनायक भाट, प्रेम सातपुते यांनी सहभाग नोंदविला.

लोकमत कोल्हापूर, सोमवार, दि. १३ जानेवारी २०२०

# ज्येष्ठांसह युवकांचा उत्स्फूर्त सहभाग

## ३७वी महास्वच्छता मोहीम : बारा टन कचरा, प्लास्टिकचा उठाव

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शहरामध्ये रविवारी झालेल्या महास्वच्छता अभियानामध्ये १२ टन कचरा व प्लास्टिक गोळा केला. विशेष म्हणजे स्वच्छता मोहिमेचा सलग ३७ वा रविवार आहे. अभियानात शहरातील ज्येष्ठ नागरिक, शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंटऑफ टेक्नॉलॉजी, विवेकानंद कॉलेज विद्यार्थी, वृक्षप्रेमी संघटना, स्वरा फौंडेशन, कोल्हापूर शहर परीट समाज, मेनन कंपनीचे कर्मचारी, स्वच्छतादूत अमित देशपांडे उपस्थित होते. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम झाली.

यावेळी आयुक्त डॉ. कलशेट्टी म्हणाले, शासनाकडून स्वच्छ भारत अभियानातून स्पर्धा सुरु असून, देशात ५ च्या आत क्रमांक येण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत; यासाठी सर्वांनी ओला व सुका कचरा वेगवेगळा साठवून ओल्या कचऱ्यापासून घरी खतनिर्मिती करावी. स्वच्छ सर्वेक्षणातील जे सात निकष आहेत त्यामध्ये शहरवासीयांनी आपले अभिप्राय द्यावेत. नर्सरी बागेतील राजर्षी शाहू समाधिस्थळाचे रविवारी लोकार्पण होणार आहे. यावेळी या परिसराचीही स्वच्छता केली. नगरसेविका सुरेखा शहा, श्रीकांत बनछोडे, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, आर. के. पाटील, बाबा साळोखे, सचिन पांडव, शशिकांत भालकर, स्वरा फौंडेशनचे आदित्य लातूरकर, व्हाईट आर्मीचे प्रशांत शेंडे, आदी उपस्थित होते.



महापालिकेच्या स्वच्छता अभियानांतर्गत गंगावेश येथे स्वच्छता मोहीम राबविली. यावेळी ज्येष्ठ नागरिक, विविध सामाजिक संघटनांचा सहभाग होता.

### स्वच्छता केलेला परिसर

रंकाळा तलाव शाहू स्मृती बाग, आयसोलेशन हॉस्पिटल ते शेंडा पार्क, रिलायन्स मॉलमागील परिसर, डायना पार्क येथील ओपन स्पेस, शुक्रवार पेठ गायकवाड वाडानजीक, शिर्के उद्यान, रेल्वे गुड्स, कोटीतीर्थ तलाव, हुतात्मा पार्क, दसरा चौक ते खानविलकर पेट्रोल पंप, रंकाळा टॉवर ते फुलेवाडी फायर स्टेशन, डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी शिवाजी विद्यापीठ रोड, उड्डाण पूल ते कावळा नाका व कावळा नाका ते तावडे हॉटेल

### यंत्रणा

४ जेसीबी, ५ डंपर, ६ आरसी गाड्या व मनपाचे १४० स्वच्छता कर्मचारी.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । सोमवार, ९ मार्च २०२०

# महास्वच्छता अभियानात सात टन कचरा संकलित

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

पृथ्वी रक्षण

महास्वच्छता अभियानांतर्गत रविवारी महापालिकेच्या १५० कर्मचाऱ्यांनी शहराच्या विविध भागातून सात टन कचरा व प्लास्टिक संकलीत केले. जयंती नाल्यातून वाहून आलेला तीन डंपर प्लास्टिक कचरा बाहेर काढण्यात आला. स्वच्छतेनंतर तपोवन मैदानावर झालेल्या महिला दिन कार्यक्रमात प्लास्टिक व थर्माकोलमुक्तीबाबत जनजागृती करण्यात आली.

दोन आठवड्यापूर्वी जयंती नाल्याची खोली वाढवण्यासाठी पात्रातील गाळ काढण्यात आला. यामुळे सांडव्यावरुन वाहून जाणाऱ्या पाण्याला अटकाव बसला असला तरी मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा येऊन साचला आहे. शनिवारी आरोग्य विभागाने कचरा काढून सांडव्यावर ठेवला होता. महास्वच्छता अभियानांतर्गत सकाळी पात्रातील कचरा बाहेर काढला. त्यानंतर तपोवन ग्राउंड, गांधी मैदान, पंचगंगा नदी घाट, रियालन्स मॉल, हुतात्मा पार्क तसेच कमला कॉलेज, उषाराजे हायस्कूल ग्राउंडची सफाई करण्यात आली. तसेच टाकाळा येथील मोठ्या चॅनल्सची सफाई केली.

जयंती नाला सांडव्यावरुन पंचगंगा नदीमध्ये प्लास्टिक कचरा जाऊ नये, यासाठी स्वतः आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी प्लास्टिक कचरा बाहेर काढण्यासाठी कर्मचाऱ्यांना सूचना देत होते. येथून तीन डंपर कचरा बाहेर काढण्यात आला. चार जेसीबी, पाच डंपर आणि सहा आरसी गाड्या व १५० कर्मचारी मोहिमेत सहभागी झाले. अमित देशपांडे, विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी, कोल्हापूर फ्लोगर्स ग्रुपने सहभाग घेतला. उपायुक्त निखिल मोरे, आरोग्यधिकारी डॉ. दिलीप पाटील, उपशहर अभियंता हर्षजित घाटगे, शाखा अभियंता आर. के. पाटील, मुख्य आरोग्य निरिक्षक जयवंत पोवार, विभागीय निरीक्षक राहुल राजगोळकर उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । सोमवार, १६ मार्च २०२०



# स्वच्छता मोहिमेत पाच टन कचरा जमा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शहरात रविवारी राबविण्यात आलेल्या महास्वच्छता अभियानामध्ये पाच टन कचरा व प्लास्टिक जमा करण्यात आला. मोहिमेचा ४६ वा रविवार असून, मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले.

यावेळी वृक्षप्रेमी आर्गनायझेशन संस्थेकडून व पालिकेच्यावतीने टाकाळा, राजारामपुरी, रेल्वे फाटक, फुलेवाडी रंकाळा, पंचगंगा नदी, लक्ष्मीपुरी, शाहूपुरी, प्रतिभा नगर, सुभाष रोड, ट्राफिक ऑफिस, जयंती पंपिंग स्टेशन परिसर येथील सुमारे ५४० झाडांना पाणी घालण्यात आले. तसेच औषध फवारणीही करण्यात आली.

मोहिमेत इराणी खण, सिद्धिविनायक हॉस्पिटल, रियालन्स मॉल संपूर्ण परिसर, दसरा चौक ते खानविलकर पेट्रोल पंप, पंचगंगा नदी घाट, ॲस्टर आधार हॉस्पिटलनजीक, हुतात्मा पार्क, पितळी गणपती ते धैर्यप्रसाद हॉल चौक, बावडा कोर्ट ते भगवा चौक, कावळा नाका ते रुईकर कॉलनी रोड तसेच संभाजीनगर रोड सफाई व जयंती नदी संप व पंप हाउस बंधारा येथील सांडपाण्यावर तरंगणारा प्लास्टिक कचरा काढला. तीन जेसीबी, सहा डंपर, सहा आरसी गाड्या व महापालिकेच्या १३० स्वच्छता

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । सोमवार, १६ मार्च २०२०



# स्वच्छता मोहिमेत पाच टन कचरा जमा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शहरात रविवारी राबविण्यात आलेल्या महास्वच्छता अभियानामध्ये पाच टन कचरा व प्लास्टिक जमा करण्यात आला. मोहिमेचा ४६ वा रविवार असून, मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले.

यावेळी वृक्षप्रेमी आर्गनायझेशन संस्थेकडून व पालिकेच्यावतीने टाकाळा, राजारामपुरी, रेल्वे फाटक, फुलेवाडी रंकाळा, पंचगंगा नदी, लक्ष्मीपुरी, शाहूपुरी, प्रतिभा नगर, सुभाष रोड, ट्राफिक ऑफिस, जयंती पंपिंग स्टेशन परिसर येथील सुमारे ५४० झाडांना पाणी घालण्यात आले. तसेच औषध फवारणीही करण्यात आली.

मोहिमेत इराणी खण, सिद्धिविनायक हॉस्पिटल, रियालन्स मॉल संपूर्ण परिसर, दसरा चौक ते खानविलकर पेट्रोल पंप, पंचगंगा नदी घाट, ॲस्टर आधार हॉस्पिटलनजीक, हुतात्मा पार्क, पितळी गणपती ते धैर्यप्रसाद हॉल चौक, बावडा कोर्ट ते भगवा चौक, कावळा नाका ते रुईकर कॉलनी रोड तसेच संभाजीनगर रोड सफाई व जयंती नदी संप व पंप हाउस बंधारा येथील सांडपाण्यावर तरंगणारा प्लास्टिक कचरा काढला. तीन जेसीबी, सहा डंपर, सहा आरसी गाड्या व महापालिकेच्या १३० स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने ही मोहीम राबविली. ज्येष्ठ नागरिक, उज्ज्वल कोल्हापूर ग्रुप, विवेकानंदचे एनएसएसचे विद्यार्थी, डी. डी. शिंदे सरकार कॉलेजचे विद्यार्थी, वृक्षप्रेमी ऑर्गनायझेशन संस्था, अमित साखरे युवा मंच संस्थेचे कार्यकर्ते, स्वरा फाउंडेशनचे प्रमोद माजगावकर व कार्यकर्ते, स्वच्छतादूतही सहभागी झाले.

महाराष्ट्र टाइम्स
सोमवार, २० जानेवारी २०२०

# स्वच्छता अभियानात १४ टन कचरा जमा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

महापालिकेच्यावतीने रविवारी शहरात राबविलेल्या महास्वच्छता अभियानामध्ये १४ टन कचरा व प्लास्टिक जमा करण्यात आला. हा ३८ वा रविवार असून, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, शहाजी छत्रपती महाविद्यालय यांच्या विद्यार्थ्यांबरोबर महापालिकेचे कर्मचारी सहभागी झाले होते.

सोन्या मारुती चौक ते खानविलकर पेट्रोल पंप ते नर्सरी बाग, सिद्धार्थनगर, भवानी मंडप ते सीपीआर चौक, व्हीनस कॉर्नर ते कावळा नाका, बिंदू चौक, टेंबलाईवाडी उड्डाण पूल ते सर्किट हाउस, भगवा चौक, धैर्यप्रसाद हॉल परिसर, महावीर कॉलेज मेनरोड ते बसंत बहार मेन रोड, टायटन शोरुम, रियालन्स मॉल ते उमा टॉकीज, पंचगंगा घाट या परिसराची स्वच्छता करण्यात आली. चार जेसीबी, पाच डंपर, सहा आरसी गाड्या व महापालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने मोहीम राबविण्यात आली. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, प्राचार्य डॉ. आर के शानेदिवाण, अमित देशपांडे, पर्यावरण विभाग प्रमुख दीपा पाटील, आरोग्य अधिकारी डॉ. दिलीप पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, आदी उपस्थित होते.

महासत्ता
कोल्हापूर-सांगली-सातारा-बेळगांव
मंगळवार, ता. १७ मार्च २०२०

# महास्वच्छता अभियानात ५ टन कचरा, प्लास्टिक गोळा

## ■ एनएसएस, एनसीसी विद्यार्थी व सेवाभावी संस्थांचा सहभाग ■

कोल्हापूर ता.१६ (प्रतिनिधी)–

महास्वच्छता अभियानामध्ये विवेकानंद कॉलेजचे एन.एस.एस, डी.डी.शिंदे सरकार कॉलेजचे एन.सी.सी विद्यार्थी व सेवाभावी संस्थांनी सहभाग घेतला. या महास्वच्छता अभियानामध्ये ५ टन कचरा व प्लॅस्टिक गोळा करण्यात आला.अभियानामध्ये शहरातील जेष्ठ नागरीक, उज्वल कोल्हापूर ग्रुप, विवेकानंद कॉलेजचे एन.एस.एस.चे विद्यार्थी,डी.डी.शिंदे सरकार कॉलेज के.जी.आंबुलगेकरसर व एन.सी.सी. विद्यार्थी विद्यार्थीनी, वृक्षप्रेमी ऑर्गनायझेशन संस्था, अमित साखरे युवामंच संस्थेचे कार्यकर्ते, स्वरा फौंडेशनचे प्रमोद माजगांवकर व कार्यकर्ते, स्वच्छता दूत अमित देशपांडे व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला.

आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांचे मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी आयुक्तांनी कोरोनाबाबत दक्षता घ्यावी, सर्वांनी वारंवार हात स्वच्छ साबणाने धुवावे, सकस व ताजे अन्ना घ्यावे, आजारी व्यक्तींनी घरीच थांबावे, गर्दीमध्ये जाऊ नये, डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, अफवांवर कोणीही विश्वास ठेवू नये असे आवाहन केले.वक्षप्रेमी आर्गनायझेशन संस्थेकडून व महानगरपालिकेच्यावतीने टाकाळा, राजारामपुरी, रेल्वे फाटक, फुलेवाडी रंकाळा,पंचगंगा नदी, लक्ष्मीपुरी, शाहुपूरी, प्रतिभा नगर, सुभाषरोड, ट्रॅफिक ऑफिस, जयंती पंपिंग स्टेशन परिसर येथील सुमारे ५४० झाडांना पाणी घालने, औषध फवारिणी करण्यात आली. तसेच अंदाजे १४० झाडांवरचे जाहीरात फलक, मोळे, डिजीटल बॅनर उतरवण्यात आले. पर्यावरण पूरक सदेश देणारी वृक्षप्रेमी आर्गनायझेशन संस्थेचे या उपक्रमाबद्दल आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांनी कौतुक केले.



साफसफाई करताना घेतलेले छायाचित्र.

स्वच्छता मोहिम इराणी खण, सिध्दीविनायक हॉस्पिटल, रिलायन्स मॉल संपुर्ण परिसर, दसरा चौक ते खानविलकर पेट्रोल पंप, पंचगंगा नदी घाट, अस्टर आधार हॉस्पिटल नजीक, हुतात्मा पार्क, पितळी गणपती ते धैर्यप्रसाद हॉल चौक, बावडा कोर्ट ते भगवा चौक, कावळा नाका ते रुईकर कॉलनी रोड तसेच संभाजीनगर रोड सफाई व जयंती नदी संप व पंप हौस येथे राबविण्यात आली.

यावेळी उप आयुक्त निखील मोरे, आरोग्यधिकारी डॉ.रमेश जाधव, उप शहर अभियंता बाबुराव दबडे, शाखा अभियंता आर.के.पाटील, मुख्य अग्निशमन अधिकारी रणजित चिले, परवाना अधिक्षक राम काटकर, मुख्य आरोग्य निरिक्षक जयवंत पोवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, सर्व आरोग्य निरिक्षक, कर्मचारी व नागरिक यांनी सहभाग नोंदविला.

महासत्ता सोमवार, ता.२४ फेब्रुवारी २०२०

# महास्वच्छता अभियानात आठ टन कचरा, प्लास्टिक गोळा

**कोल्हापूर ता.२३ (प्रतिनिधी)**

कोल्हापूर शहरामध्ये झालेल्या महास्वच्छता अभियानामध्ये आठ टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आला. सदर मोहिमेचा त्रेचाळीसावा रविवार असून या अभियानामध्ये शहरातील ज्येष्ठ नागरीक, स्वरा फौंडेशन कार्यकर्ते, स्वच्छता दुत अमित देशपांडे, विवेकानंद कॉलेजचे एन.एस.एसचे विद्यार्थी, वृक्षप्रेमी स्वंयसेवी संस्था व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला. सदरची मोहीम आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांचे मार्गदर्शनाखाली पार पडली.

संप आणि पंप हौस येथे संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन आजच्या स्वच्छता मोहिमेची सुरवात करण्यात आली. यावेळी याठिकाणी स्वरा फौंडेशनच्यावतीने वृक्षारोपण करण्यात आले.



**कोल्हापूर येथील महास्वच्छता अभियानात सहभागी झालेले आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी व अन्य पदाधिकारी, विद्यार्थी, कर्मचारी.**

यावेळी गांधी मैदान, पंचगंगा नदी घाट, रियालन्स मॉल संपूर्ण परिसर, दसरा चौक ते खानविलकर पेट्रोलपंप व माळकर तिकटी ते छत्रपती शिवाजी मार्केट, हुतात्मा पार्क, टेंबलाईवाडी उड्डान ते लोणार वसाहत मेनरोड तसेच कळंबा तलाव या परिसराचीही स्वच्छता या मोहिमेत करण्यात आली. या मोहिमेत ४ जेसीबी, ६ डंपर, ६ आरसी गाडया व महापालिकेच्या १२० स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने ही स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

तसेच संत निरंकारी चॅरिटेबल फौंडेशनच्यावतीने सावित्रीबाई फुले हॉस्पिटल येथे बाबा हरदेव सिंह जी महाराज यांच्या जयंतीनिमित्त हॉस्पिटल परिसरात वृक्षारोपन करून सावित्रीबाई फुले हॉस्पिटलची स्वच्छता करण्यात आली.

यावेळी आरोग्यधिकारी डॉ.दिलीप पाटील, शाखा अभियंता आर.के.पाटील, मुख्य आरोग्य निरिक्षक जयवंत पोवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, माजी नगरसेवक मधुकर रामाणे, कळंबा ग्रामपंचायचे सरपंच सागर भोगम, पाचगाव सरपंच संग्राम पाटील, क्रिडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर, दिलीप देसाई, सौ. स्मिता गिरी, विवेकानंद कॉलेज एन.एस.एसचे विद्यार्थी, ही सर्व आरोग्य निरिक्षक, कर्मचारी व नागरिक सहभागी झाले होते.

महासत्ता सोमवार, ता.२० जानेवारी २०२०

# महास्वच्छता अभियानात १४ टन कचरा गोळा

**कोल्हापूर, ता.१९(प्रतिनिधी)–**

शहरात महास्वच्छता अभियानामध्ये १४ टन कचरा व प्लॅस्टिक गोळा करण्यात आला. मोहिमेचा अडत्तीसावा रविवार असून या अभियानामध्ये शहरातील स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे विद्यार्थी -विद्यार्थीनी, डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे विद्यार्थी, विद्यार्थीनी, दसरा चौक येथील शहाजी छत्रपती महाविद्यालय, प्राचार्य डॉ.आर.के. शानेदिवाण, जेष्ठ नागरीक, कर्मचारी, स्वच्छता दुत अमित देशपांडे, पर्यावरण विभाग प्रमुख सौ.दिपा पाटील व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला. सदरची मोहिम आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांचे मार्गदर्शनाखाली पार पडली.

यावेळी आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांनी यावेळी बोलताना आज सलग अडत्तीसावा रविवार आहे. दर महिन्यातून एकदा स्वच्छता मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे, प्लॅस्टिकचा वापर करु नका व इतरानांही करु देवू नका असे सांगितले.

यावेळी सोन्या मारुती चौक ते खानविलकर पेट्रोलपंप ते नर्सरी बाग, सिध्दार्थनगर, भवानी मंडप ते सीपीआर चौक, व्हीनस कॉर्नर ते कावळा नाका, बिंदू चौक, टेंबलाईवाडी उड्डान पूल ते सर्किट हाऊस मेनरोड, भगवा चौक, धैर्यप्रसाद हॉल परिसर, महावीर कॉलेज मेनरोड ते बसंत बहार मेनरोड, टायटन शोरुम, रिलायन्स मॉल ते उमा टॉकीज, पंचगंगा घाट या परिसराची स्वच्छता या मोहिमेत करण्यात आली. या मोहिमेत ४ जेसीबी, ५ डंपर, ६ आरसी गाडया व महापालिकेच्या ४५० स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने ही स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

तसेच श्री स्वामी समर्थ महाराज यांचे नामकरण सोहळया निमित्त पंचगंगा घाट परिसरात श्री स्वामी समर्थ महाराज ट्रस्टचे कर्मचारी व महापालिकेच्या कर्मचारी यांनी स्वच्छता केली. यावेळी आरोग्यधिकारी डॉ.दिलीप पाटील, मुख्य आरोग्य निरिक्षक जयवंत पोवार, शाखा अभियंता आर.के.पाटील, सर्व आरोग्य निरिक्षक व नागरिक यांनी सहभाग नोंदविला.

पुण्य नगरी SMART ■ सोमवार, ९ मार्च २०२० ■ कोल्हापूर

# 'जयंती'तून उचलले तीन डंपर प्लास्टिक

कोल्हापूर : प्रतिनिधी

शहरामध्ये महास्वच्छता अभियानामध्ये सलग ४५ व्या रविवारी सात टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आला. यामध्ये जयंती नाल्यात तरंगणाऱ्या तीन डंपर प्लास्टिक कचऱ्याचा समावेश आहे. तसेच तपोवन ग्राऊंड येथे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्लास्टिक व थर्माकोल मुक्तीबाबत जनजागृती करण्यात आली.

या मोहिमेत तपोवन ग्राऊड, गांधी मैदान, पंचगंगा नदीघाट, रिलायन्स मॉल संपूर्ण परिसर, जयंती नदी पंपिंग स्टेशन, हुतात्मा पार्क तसेच कमला कॉलेज, उषाराजे हायस्कूल ग्राऊंडची सफाई, टाकाळा येथील चॅनल सफाई, जयंती नदी संप व पंप हाऊस बंधारा येथील सांडपाण्यातील प्लास्टिक तीन डंपर काढण्यात आला. मोहीम चार जेसीबी, पाच डंपर, सहा आरसी गाड्या व १५० स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने राबविण्यात आली.



कोल्हापूर : जयंती नाला येथील कचरा उठाव करताना महापालिकेचे कर्मचारी, नागरिक. (छाया : पांडुरंग पाटील)

या अभियानामध्ये शहरातील ज्येष्ठ नागरिक, स्वरा फौंडेशन प्रमोद माजगावकर व कार्यकर्ते, स्वच्छतादूत अमित देशपांडे, विवेकानंद कॉलेजचे एन.एस.एस.चे विद्यार्थी, कोल्हापूर फ्लोगर्स ग्रुपचे, अमित साखरे युवामंच, ताराराणी हायस्कूल, राजारामपुरी संस्थेचे कार्यकर्ते, अग्निशमन विभागाचे जवान आणि महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. ही मोहीम आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. उपआयुक्त निखिल मोरे, आरोग्यधिकारी डॉ. दिलीप पाटील, उपशहर अभियंता हर्षजित घाटगे, शाखा अभियंता आर. के. पाटील, मुख्य अग्निशमन अधिकारी रणजित चिले, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर यांच्यासह सर्व आरोग्य निरीक्षक, कर्मचारी व नागरिक यांनी सहभाग नोंदविला.

पुण्य नगरी सोमवार, २ मार्च २०२०

# महास्वच्छता अभियानात ६ टन कचरा जमा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शहरामध्ये महास्वच्छता अभियानास सलग ४४ व्या रविवारीही नागरिकांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यामध्ये दि. १ रोजी ६ टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. सीपीआर हॉस्पिटल येथे वृक्षप्रेमी आर्गनायझेशनचे कार्यकर्ते आणि नागरिकांना आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी स्वच्छतेची शपथ देऊन स्वच्छता मोहिमेस प्रारंभ करण्यात आला.

यावेळी वृक्षप्रेमी आर्गनायझेशनच्या पर्यावरणपूरक संदेश देणाऱ्या पाणपोईचे अनावरण आयुक्त डॉ. कलशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच पंचगंगा नदी घाट परिसरातील १८० झाडांना पाणी घालणे, तसेच त्या ठिकाणची साफसफाईही संस्थेने केली.

या मोहिमेत गांधी मैदान, पंचगंगा नदी घाट, रियालन्स मॉल संपूर्ण परिसर, जयंती नदी पंपिंग स्टेशन, हुतात्मा पार्क, डायना पार्क येथील चॅनल सफाई आणि स्वच्छता करण्यात आली. ही मोहीम ५ जेसीबी, ६ डंपर, ६ आरसी गाड्या, १ ट्रॅक्टर आणि महापालिकेच्या ७० स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने राबविण्यात आली. मोहिमेत आरोग्यधिकारी डॉ. दिलीप पाटील, शाखा अभियंता आर. के. पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर यांच्यासह ज्येष्ठ नागरिक, स्वरा फौंडेशन कार्यकर्ते, स्वच्छतादूत अमित देशपांडे, विवेकानंद कॉलेजचे एन.एस.एस.चे विद्यार्थी, धर्माधिकारी प्रतिष्ठानचे कार्यकर्ते यांचाही सहभाग होता.

15

पुण्य नगरी
बुधवार, ५ फेब्रुवारी २०२०

# सह्याद्री शिक्षणरत्न पुरस्काराने प्रा. संदीप पाटील सन्मानित

सांगवडे / प्रतिनिधी :

वसगडे (ता. करवीर) येथील प्रा. संदीप पाटील यांना सह्याद्री उद्योगसमूह अहमदनगर यांच्यामार्फत दिला जाणारा राज्यस्तरीय सह्याद्री शिक्षणरत्न पुरस्कार ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. प्रा. संदीप पाटील विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे अर्थशास्त्र विषयाचे अध्यापन करत असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रीय सत्रामध्ये त्यांनी सहभाग घेतला आहे. 'आव्हान' या राज्यस्तरीय शिबिरांमध्ये शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले आहे. मानव विकास फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष असून महास्वच्छता अभियान, वृक्षारोपण, आरोग्य शिबिराचे आयोजन, लेक वाचवा जनजागृती यासारख्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. या त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना सह्याद्री शिक्षणरत्न हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. 05

पुण्य नगरी

सोमवार, १३ जानेवारी २०२०

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम झाली. यामध्ये ज्येष्ठ नागरिक, शिवाजी विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, वृक्षप्रेमी संघटना, स्वरा फौंडेशनचे कार्यकर्ते, कोल्हापूर शहर परीट समाज कार्यकर्ते, मेनन कंपनीचे कर्मचारी, स्वच्छता दूत अमित देशपांडे व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला. तसेच नगरसेविका सुरेखा शहा, माजी नगरसेवक श्रीकांत बनछोडे, आरोग्य अधिकारी डॉ.दिलीप पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, शाखा अभियंता आर. के. पाटील, शिक्षणचे बाबा साळोखे, क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, सर्व आरोग्य निरीक्षक, स्वरा फौंडेशनचे अदित्य लातूरकर, व्हाईट आर्मीचे प्रशांत शेंडे व नागरिक उपस्थित होते.

पुण्य नगरी
कोल्हापूर
। सोमवार, २४ फेब्रुवारी २०२०

# प्लास्टिक हटाओ, देश बचाओ

## शहरातील प्रमुख मार्गावरून प्लास्टिकमुक्त जनजागृती रॅली

कोल्हापूर / प्रतिनिधी :

'प्लास्टिक हटाओ...देश बचाओ, कापडी पिशवी घरोघरी पर्यावरणाचे रक्षण करी', अशा घोषणा देत महानगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रमुख मार्गावरून प्लास्टिकमुक्त जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीचा प्रारंभ श्रीमंत शाहू महाराज छत्रपती, महापौर निलोफर आजरेकर यांच्या हस्ते ताराराणी चौकातून करण्यात आला.



कोल्हापूर : प्लास्टिकमुक्ती जनजागृती रॅलीत सहभागी श्रीमंत शाहू महाराज छत्रपती, महापौर निलोफर आजरेकर, आ. चंद्रकांत जाधव व इतर. (छाया : पांडुरंग पाटील)

प्लास्टिकमुक्ती आराखड्यानुसार आयोजित जनजागरण रॅलीच्या प्रारंभी आमदार चंद्रकांत जाधव, उपमहापौर संजय मोहिते, स्थायी समिती सभापती संदीप कवाळे, परिवहन सभापती प्रतिज्ञा उत्तुरे, विरोधी पक्षनेता विजय सूर्यवंशी, आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी आदिंची उपस्थिती होती. दसरा चौक येथे येऊन रॅलीची सांगता करण्यात आली.

यामध्ये विविध ठिकाणांहून शाळा, कॉलेज, संस्था, महानगरपालिकेचे सर्व विभागांतील अधिकारी, कर्मचारी सहभागी होते. ताराराणी चौक येथून विवेकानंद कॉलेज एनसीसी विद्यार्थी-विद्यार्थिनी, विविध संघटना यांनी मिळून काढली. या रॅलीच्या मार्गावरील सर्व ठिकाणचे प्लास्टिक, कप यासह इतर वस्तू गोळा करण्यात येत होत्या. रॅलीदरम्यान जनता बझार चौक, रिलायन्स मॉल, मिरजकर तिकटी, पाडळकर मार्केट येथे कोपरा सभा घेऊन मान्यवरांनी प्रबोधन केले. नगरसेवक, नगरसेविका कृती समिती सदस्य, संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# महास्वच्छता अभियानात आठ टन कचरा जमा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## गाडगेबाबांना अभिवादन करून स्वच्छता मोहीम

आपल्या कृतीद्वारे स्वच्छतेचा संदेश देऊन प्रबोधन करणाऱ्या संत गाडगेबाबांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करून महापालिकेच्यावतीने रविवारी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छतेला वृक्षारोपणाची जोड देत दिवसभरात आठ टन कचरा व प्लास्टिक संकलित करण्यात आले.

गाडगेबाबांच्या जयंतीचे औचित्य साधून जयंती नाला येथील पंप हाउस येथे त्यांच्या प्रतिमेचे पूजन आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते झाले. यावेळी स्वरा फाउंडेशनने वृक्षारोपण करून अभिवादन केले. त्यानंतर गांधी मैदान, पंचगंगा नदी घाट, माळकर तिकटी ते छत्रपती शिवाजी मार्केट, हुतात्मा पार्क, टेंबलाईवाडी उड्डान पूल ते लोणार वसाहत मेनरोड तसेच कळंबा तलाव येथे अनेक स्वयंसेवी संस्था व पर्यावरणप्रेमी सहभागी झाले होते.

यावेळी आरोग्यधिकारी डॉ. दिलीप पाटील, आर. के. पाटील, राहुल राजगोळकर, संग्राम पाटील, विद्यानंद बेडेकर, दिलीप देसाई, प्रा. स्मिता गिरी, विवेकानंद कॉलेज एनएसएसचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

पुण्यनगरी दि० १५/७/२०२०

# 'एनएसएस'चे ऑनलाईन शिबिर प्रेरणादायी : प्राचार्य अभयकुमार साळुंखे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसाठी आयोजित ऑनलाईन शिबिर कोविडच्या काळात खऱ्या अर्थाने प्रेरणा देणारे आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक या शिबिराच्या माध्यमातून एक नवी ऊर्जा घेऊन सेवाभावी भूमिकेतून समाजसेवेस सुज्ज होतील, असा विश्वास श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठाची राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाईन प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर अध्यक्षस्थानी होते. यूट्यूबच्या माध्यमातून महाराष्ट्रातून हजारो स्वयंसेवक-स्वयंसेविका शिबिरात सहभागी झाले.

स्वयंसेवकांशी ऑनलाईन संवाद साधताना प्राचार्य साळुंखे म्हणाले, प्रेरणा शिबिरातून व्यक्तिमत्त्व विकासबरोबर नवे नेतृत्व उभे राहणार आहे. यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नक्कीच महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

अध्यक्षीय भाषणात प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी कोविडच्या संकटकाळात एनएसएसचे स्वयंसेवक-स्वयंसेविका यांचे योगदान महत्त्वपूर्ण व प्रेरणादायी असल्याचे सांगितले. डॉ. अतुल साळुंके यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, स्वाती मोहपात्रा यांनी मनोगत व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाचे संचालक अभय जायभाये यांनी आभार मानले. यावेळी महाराष्ट्रातील विद्यापीठांतील एनएसएस संचालक, जिल्हा समन्वयक, कार्यक्रम अधिकारी झूम व यूट्यूबच्या माध्यमातून ऑनलाईन सहभागी झाले होते.

पुण्य नगरी

गुरुवार, २९ ऑक्टोबर २०२०

# 'विवेकानंद'मध्ये दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद कॉलेज येथे महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमानुसार सतर्क भारत, समृद्ध भारत या संकल्पनेनुसार २७ ऑक्टो. ते २ नोव्हेंबर या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. एच. पी. पाटील यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. राज्यपाल व महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. डी. बी. पाटील यानी सर्वांना माहिती दिली. सर्वांनी आपले कामकाज निष्ठेने व नियोजित वेळेत पूर्ण केले पाहिजे. कोणत्याही कामासाठी लाचलुचपत, भ्रष्टाचार करू नये. कामातूनच माणसाला जीवनात यशस्वी होता येते. पारदर्शी आणि प्रामाणिकपणे केलेले काम आनंद देते, असे ते म्हणाले. प्रा. किरण पाटील यांनी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांच्यासमवेत भ्रष्टाचार निर्मूलन शपथीचे वाचन केले. कार्यक्रमास प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.

पुण्य नगरी
शनिवार, १ फेब्रुवारी २०२०

# वसगडेत श्रमसंस्कार शिबिर

**सांगवडे / प्रतिनिधी :**

प्लास्टिकमुक्त गाव, ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती, सांडपाण्याचे योग्य नियोजन करून, पंचगंगा प्रदूषण टाळण्यासाठी शिबिरार्थींनी ग्रामस्थांचे प्रबोधन करावे, असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले.

ते स्वामी विवेकानंद कॉलेज व शिवाजी विद्यापीठ आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत वसगडे (ता. करवीर) येथे विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य एस. वाय. होनगेकर होते. यामध्ये १७५ शिबिरार्थींनी सहभाग घेतला.

यावेळी करवीर पं. स. सदस्या शोभा राजमाने, सरपंच नेमगोंडा पाटील व माजी उपसरपंच सुनील पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास पर्यावरणतज्ज्ञ उदय गायकवाड, तंटामुक्तीचे अध्यक्ष शशिकरण हेरवाडे, रावसाहेब पाटील, भुजगोंडा पाटील, डॉ. श्रीकांत चौगुले, बाबासो पाटील, सचिन पाटील, प्रकल्प अधिकारी प्रा. एस. पी. पाटील, प्रा. संदीप पाटील, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. वाय. डी. हरताळे, प्रा. बी. के. गावित, शिबिरार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

पुढारी कोल्हापूर, सोमवार, ६ जानेवारी २०२०

# महास्वच्छतेला प्रतिसाद

## ३६ व्या रविवारी नऊ टन कचरा संकलन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शहरामध्ये रविवारी झालेल्या महास्वच्छता अभियानामध्ये ३६ व्या रविवारी ९ टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. शाहू उद्यान येथे स्वरा फाऊंडेशनचे कार्यकर्ते व नागरिक यांना स्वच्छतेची शपथ देऊन स्वच्छता मोहिमेस प्रारंभ करण्यात आला.

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी म्हणाले, महानगरपालिकेला ODF++ हा बहुमान मिळाला आहे. आता फाईव्ह स्टार हा बहुमान पटकावण्यासाठी प्रयत्न करूया, त्यात सर्वांचाच सहभाग महत्त्वाचा आहे. दर महिन्यातून एकदा स्वच्छता मोहिमेत सर्वांनी सहभागी व्हावे, प्लास्टिकचा वापर करू नका व इतरानांही करू देऊ नका, असे आवाहनही त्यांनी केले. या मोहिमेत शहरातील ज्येष्ठ नागरिक, मंगळवार पेठ फुटबॉल क्लबचे खेळाडू, विवेकानंद, यशवंतराव चव्हाण कॉलेजचे प्रिन्सिपल, विद्यार्थी, विद्यार्थिनी आदींनी सहभाग नोंदविला.

यावेळी हॉकी स्टेडियम, दसरा चौक ते खानविलकर पेट्रोल पंप, माळकर तिकटी ते शिवाजी मार्केट, रंकाळा टॉवर ते फुलेवाडी फायर स्टेशन, सायबर चौक ते शेंडा पार्क, उड्डाणपूल ते कावळा नाका व कावळा नाका ते तावडे हॉटेल, संभाजीनगर ते कळंबा जेलपर्यंत, डीएसपी ऑफिस ते भगवा चौक मेनरोड, कोटीतीर्थ तलाव, गांधी मैदान, शुक्रवार पेठ गायकवाड वाडा, पद्माराजे शाळा, रिलायन्स मॉल संपूर्ण, माळकर तिकटी या परिसरात तसेच हॉकी स्टेडियम येथील चॅनेलचीही स्वच्छता करण्यात आली. या मोहिमेत ५ जेसीबी, ६ डंपर, ११ आरसी गाड्या, १ टिपर व महापालिकेच्या १८० स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने ही स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत मनपाचे अधिकारी, नगरसेवक व कर्मचारी सहभागी झाले होते.

पुढारी

सोमवार, ९ नोव्हेंबर २०२०

# स्वच्छता मोहिमेत दोन टन कचरा जमा

## नागरिकांनी घेतली स्वच्छतेची शपथ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महापालिकेच्यावतीने रविवारी शहरातील विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मोहिमेत दोन टन कचरा जमा करण्यात आला. सामाजिक संस्थांच्या सहभागाने दुर्मीळ तसेच औषधी वृक्ष लागवड, जुन्या झाडांना आधारासाठी काठ्या व शेडनेट बांधण्यात आली. उपस्थितांनी यावेळी स्वच्छतेची शपथ घेतली.



**कोल्हापूर : महापालिकेतर्फे शहरात ८०वी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. विविध ठिकाणी सेवाभावी संस्था आणि नागरिकांच्या सहभागाने स्वच्छता करण्यात आली. (छाया : नाज ट्रेनर)**

महापालिकेच्या ८० व्या स्वच्छता मोहिमेत शहरातील प्रमुख चौक आणि रस्ते, गटारी, नाले, फुटपाथ, घाट तसेच उद्यानामधील कचरा, प्लास्टिक, झाडे, झुडपे काढून परिसर स्वच्छ करण्यात आला. शहरात दुर्मीळ तसेच औषधी वृक्षलागवड करण्यात आली. स्वच्छतेबरोबरच वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देऊन नागरिकांना वृक्षारोपणाचे महत्त्व सांगण्यात आले. यावेळी स्वरा फौंडेशनमार्फत छत्रपती शाहू उद्यान परिसरात ४० झाडे लावण्यात आली. मोहिमेत वृक्षप्रेमी वेलफेअर ऑर्गनायझेशन संस्था, विवेकानंद कॉलेजचे एनसीसी व एनएसएसचे विद्यार्थी, नागरिक, आरोग्य निरिक्षक, कर्मचारी सहभागी झाले.

पुढारी

कोल्हापूर, शनिवार २५ जानेवारी २०२०

# 'विवेकानंद'मध्ये रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** विवेकानंद महाविद्यालयात एन. सी. सी., एन. एस. एस. विभाग आणि छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयाची विभागीय पतपेढी (सीपीआर) यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर झाले. शिबिरात विद्यार्थी व प्राध्यापकांनी रक्तदान केले. ७६ बाटल्या रक्त संकलित करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते झाले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी स्वागत केले. याप्रसंगी संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. युवराज भोसले, प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्रा. डी. बी. पाटील, प्रा. किरण पाटील, कला व डॉ. श्रुती जोशी उपस्थित होते.

पुढारी कोल्हापूर, सोमवार, २४ फेब्रुवारी २०२०

# महास्वच्छता अभियानात आठ टन कचरा जमा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शहरात रविवारी महापालिकेने राबविलेल्या महास्वच्छता अभियानात महापौर निलोफर आजरेकर यांनी सहभाग नोंदविला. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली शहराच्या विविध भागांत राबविलेल्या या मोहिमेत अनेक सामाजिक संस्था आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या मोहिमेत तब्बल आठ टन कचरा आणि प्लास्टिक जमा केल्याचा दावा महापालिकेने केला आहे.

महास्वस्छता मोहिमेचा हा त्रेचाळिसावा रविवार होता. त्यात शहरातील ज्येष्ठ नागरिक, स्वरा फाऊंडेशनचे कार्यकर्ते, स्वच्छता दुत अमित देशपांडे, विवेकानंद कॉलेजचे एन.एस.एस.चे विद्यार्थी, वृक्षप्रेमी, स्वंयसेवी संस्था व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून स्वच्छता मोहिमेची सुरुवात झाली. स्वरा फाऊंडेशनच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले.

गांधी मैदान, पंचगंगा नदी घाट, लक्ष्मीपुरी परिसर, दसरा चौक ते खानविलकर पेट्रोलपंप व माळकर तिकटी ते छत्रपती शिवाजी मार्केट, हुतात्मा पार्क, टेंबलाईवाडी उड्डाण पूल ते लोणार वसाहत मेनरोड तसेच कळंबा तलाव या परिसराचीही स्वच्छता या मोहिमेत करण्यात आली. संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या वतीने सावित्रीबाई फुले हॉस्पिटल येथे बाबा हरदेव सिंहजी महाराज यांच्या जयंती निमित्त हॉस्पिटल परिसरात वृक्षारोपण करून सावित्रीबाई फुले हॉस्पिटलची स्वच्छता केली.

सकाळ » TODAY
सोमवार, ९ मार्च २०२०

# महास्वच्छता अभियानात सात टन कचरा जमा

कोल्हापूर, ता. ८ : शहरात आज झालेल्या महास्वच्छता अभियानात ७ टन कचरा व प्लास्टिक जमा झाला. या मोहिमेचा ४५ वा रविवार होता. या अभियानामध्ये शहरातील ज्येष्ठ नागरिक, स्वरा फौंडेशन प्रमोद माजगावकर व कार्यकर्ते, स्वच्छता दूत अमित देशपांडे, विवेकानंद कॉलेजचे एनएसएसचे विद्यार्थी, कोल्हापूर फ्लोगर्स ग्रुपचे, अमित साखरे युवामंच ताराराणी हायस्कूल राजारामपुरी संस्थेचे कार्यकर्ते व अग्निशमन विभागाचे जवान व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला.

तपोवन मैदान, गांधी मैदान, पंचगंगा नदी घाट, रियालन्स मॉल परिसर, जयंती नाला, पंपीग स्टेशन, हुतात्मा पार्क तसेच कमला कॉलेज, उषाराजे हायस्कूल ग्राउंडची सफाई, टाकाळा येथील चॅनल सफाई, जयंती नदी संप व पंप हौस बंधारा येथील सांडपाण्यावर तरंगणारा प्लास्टिक कचरा तीन डंपर काढण्यात आला. ही मोहीम ४ जेसीबी, ५ डंपर, ६ आरसी गाड्या व महापालिकेच्या १५० स्वच्छता कर्मचा-यांच्या सहाय्याने राबविली. यावेळी निखिल मोरे, डॉ. दिलीप पाटील, हर्षजित घाटगे, आर. के. पाटील, रणजित चिले, जयवंत पोवार, राहुल राजगोळकर आदींनी सहभाग नोंदविला. 5

सकाळ
सोमवार, २ मार्च २०२०

# महास्वच्छतेत सहा टन कचरा जमा

## ४४ व्या रविवारी मोहीम; स्वयंसेवी संस्था, विद्यार्थी, नागरिकांचा सहभाग

कोल्हापूर, ता. १ : शहरात आज झालेल्या महास्वच्छता अभियानात सहा टन कचरा व प्लास्टिक जमा झाला. या मोहिमेचा ४४ वा रविवार होता. या अभियानात शहरातील ज्येष्ठ नागरिक, स्वरा फाउंडेशनचे कार्यकर्ते, स्वच्छतादूत अमित देशपांडे, विवेकानंद महाविद्यालयाचे एनएसएसचे विद्यार्थी, वृक्षप्रेमी ऑर्गनायझेशन संस्था, धर्माधिकारी प्रतिष्ठान संस्थेचे कार्यकर्ते व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला.



कोल्हापूर : महापालिकेतर्फे सलग ४४ व्या रविवारी राबविण्यात आलेली स्वच्छता मोहीम.

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली आजची ही मोहिम झाली. सीपीआर हॉस्पीटल येथे वक्षप्रेमी आर्गनायझेशन संस्थेचे कार्यकर्ते व नागरिकांना आयुक्तांनी स्वच्छतेची शपथ देऊन स्वच्छता मोहिमेस प्रारंभ केला.

यावेळी वक्षप्रेमी आर्गनायझेशन संस्थेकडून पर्यावरणपूरक संदेश देणारी पाणपोईचे अनावरण आयुक्त डॉ. कलशेट्टी यांच्या हस्ते झाले.

आरोग्यधिकारी डॉ. दिलीप पाटील, शाखा अभियंता आर. के. पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, विभागीय आरोग्य निरीक्षक राहूल राजगोळकर, सर्व आरोग्य निरिक्षक, कर्मचारी व नागरिक यांनी सहभाग नोंदविला.

### 'ऑर्गनायझेशन'तर्फे ११ वर्षे झाडांना जलसेवा

ऑर्गनायझेशन संस्थेकडून अविरत जलसेवा देण्याचे या संस्थेचे ११ वे वर्ष आहे. या संस्थेने पंचगंगा नदीघाट परिसरातील १८० झाडांना पाणी देणे, तसेच त्या ठिकाणची साफसफाई केली. या मोहिमेत गांधी मैदान, पंचगंगा नदीघाट, रियालन्स मॉल संपूर्ण परिसर, जयंती नदी पंपिंग स्टेशन, हुतात्मा पार्क तसेच डायना पार्क येथील चॅनल सफाई व स्वच्छता केली. ही मोहीम पाच जेसीबी, सहा डंपर, सहा आरसी गाड्या, एक ट्रॅक्टर व महापालिकेच्या ७० स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने राबविण्यात आली.



सकाळ

गुरुवार, ६ फेब्रुवारी २०२०



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये इलेक्ट्रॉनिक्स विभाग आयोजित अग्रणी महाविद्यालय एकदिवसीय कार्यशाळेत बोलताना प्रा.डी. एम. पन्हाळकर. शेजारी प्रा. सी. जे. कांबळे, डॉ. आर. आर. मुधोळकर, विश्वजित खाडे, डॉ. व्ही. सी. महाजन

## 'ड्रोन टेक्नॉलॉजी व करिअर संधी'वर विवेकानंदमध्ये कार्यशाळा

**कोल्हापूर :** येथील विवेकानंद कॉलेजमध्ये 'हॅण्डस ऑन ट्रेनिंग ऑफ ड्रोन टेक्नॉलॉजी' या विषयावर कार्यशाळा झाली. अग्रणी महाविद्यालय योजना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व डी. आर. के. कॉलेज ऑफ कॉमर्स क्लस्टर अंतर्गत एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. डॉ. व्ही. सी. महाजन यांनी बेसिक इलेक्ट्रॉनिक्स ते रिसेंट ट्रेड इन इलेक्ट्रॉनिक्स तसेच इलेकट्रॉनिक्सि विषयामधील करिअर संधी याबद्दल मार्गदर्शन केले. प्रथम सत्रात डॉ. आर. आर. मुधोळकर यांनी, द्वितीय सत्रात विश्वजीत खाडे यांनी विद्यार्थ्यांना ड्रोन टेक्नॉलॉजीची निर्मिती, त्याची गरज, त्याचा वापर व ड्रोन चालविण्याचे प्रशिक्षण प्रात्यक्षिकासह दिले. अध्यक्षस्थानी समन्वयक प्रा. सी. जे. कांबळे होते. प्रास्ताविक इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख प्रा. डी. एम.पन्हाळकर यांनी केले. प्रा. पी. एन. जाधव, तन्वी मंत्री यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रा. पी. आर. बागडे यांनी मानले.



कोल्हापूर : सह्याद्री शिक्षणरत्न पुरस्कार ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांचे हस्ते स्वीकारताना प्रा. संदीप पाटील. शेजारी अन्य मान्यवर.

## प्रा. संदीप पाटील यांना पुरस्कार प्रदान

**सांगवडेवाडी :** वसगडे (ता. करवीर) येथील प्रा. संदीप पाटील यांना सह्याद्री उद्योग समूह अहमदनगर यांचेमार्फत दिला जाणारा राज्यस्तरीय सह्याद्री शिक्षण रत्न पुरस्कार ज्येष्ठ समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांचे हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. प्रा. पाटील हे विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे अर्थशास्त्र विषयाचे अध्यापन करत असून, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रीय कार्यशाळामध्ये सहभाग घेतला आहे. आव्हान या राज्यस्तरीय शिबिरांमध्ये शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले आहे. मानव विकास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष असून, महा स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, आरोग्य शिबिराचे आयोजन, लेक वाचवा जनजागृतीचे कार्य उल्लेखनीय आहे. त्याची दखल घेत त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

सकाळ
कोल्हापूर, सोमवार, १६ मार्च २०२०

# शहरात महास्वच्छतेत ५ टन कचरा जमा

## ४६ व्या रविवारी मोहीम; विविध विद्यार्थ्यांसह संस्था, नागरिकांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : शहरात आज झालेल्या महास्वच्छता महाभियानात ५ टन कचरा व प्लास्टिक जमा झाला.

या मोहिमेचा ४६ वा रविवार होता. अभियानात जेष्ठ नागरीक, उज्वल कोल्हापूर ग्रुप, विवेकानंद कॉलेजचे एन.एस.एस.चे विद्यार्थी, डी.डी.शिंदे सरकार कॉलेज के.जी.आंबुलगेकरसर व एन.सी.सी. विद्यार्थी, विद्यार्थीनी, वृक्षप्रेमी ऑर्गनायझेशन संस्था, अमित साखरे युवा मंच संस्थेचे कार्यकर्ते, स्वरा फौंडेशनचे प्रमोद माजगांवकर व कार्यकर्ते, स्वच्छता दूत अमित देशपांडे व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला.



कोल्हापूर : महापालिकेतर्फे स्वच्छता अभियानांतर्गत रविवारी जयंती नाल्यातील प्लास्टिक व इतर कचरा काढताना कर्मचारी.

यावेळी वक्षप्रेमी आर्गनायझेशन संस्थेकडून व महापालिकेतर्फे टाकाळा, राजारामपुरी, रेल्वे फाटक, फुलेवाडी रंकाळा, पंचगंगा नदी, लक्ष्मीपुरी, शाहुपूरी, प्रतिभा नगर, सुभाषरोड, ट्रॅफिक ऑफिस, जयंती पंपिंग स्टेशन परिसर येथील सुमारे ५४० झाडांना पाणी घालणे, औषध फवारणी केली. १४० झाडांवरचे जाहिरात फलक, मोळे, डिजिटल बॅनर उतरवले. पर्यावरणपूरक संदेश देणारी वृक्षप्रेमी आर्गनायझेशन संस्थेचे या उपक्रमाबद्दल आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी कौतूक केले.

यावेळी कसबा बावडा भाजी मार्केट येथे कोरोनाबाबत नागरिकांत प्रबोधन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत होते. यावेळी मार्केटमध्ये कोरोना जनजागृतीबाबत माहितीपत्रक वाटली.

ही मोहिम इराणी खण, सिध्दीविनायक हॉस्पिटल, रियालन्स मॉल परिसर, दसरा चौक ते खानविलकर पेट्रोल पंप, पंचगंगा नदी घाट, अस्टर आधार हॉस्पिटलनजीक, हुतात्मा पार्क, पितळी गणपती ते धैर्यप्रसाद हॉल चौक, बावडा कोर्ट ते भगवा चौक, कावळा नाका ते रुईकर कॉलनी रोड तसेच संभाजीनगर रोड सफाई व जयंती नदी संप व पंप हाऊस बंधारा येथील सांडपाण्यावर तरंगणारा प्लास्टिक दोन डंपर काढले. येथे ३ जेसीबी, ६ डंपर, ६ आरसी गाडया व महापालिकेच्या १३० स्वच्छता कर्मचा-यांच्या सहाय्याने राबविली.

यावेळी उप आयुक्त निखील मोरे, आरोग्यधिकारी डॉ.रमेश जाधव, उप शहर अभियंता बाबुराव दबडे, शाखा अभियंता आर.के.पाटील, मुख्य अग्निशमन अधिकारी रणजित चिले, परवाना अधिक्षक राम काटकर, मुख्य आरोग्य निरिक्षक जयवंत पोवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर आदींनी सहभाग नोंदविला.

### कोरोनाबाबत अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आदेश

आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहिम झाली. यावेळी आयुक्तांनी कोरोनाबाबत दक्षता घ्यावी, सर्वांनी वारंवार हात स्वच्छ साबणाने धुवावे, सकस व ताजे अन्न घ्यावे, आजारी व्यक्तींनी घरीच थांबावे, गर्दीत जाऊ नये, डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, अफवांवर कोणीही विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले.

सकाळ

कोल्हापूर, सोमवार, १५ जून २०२०

# स्वच्छता मोहिमेत सहा टन कचरा जमा

## महापालिकेतर्फे ५९ व्या रविवारी मोहीम; विविध संस्था, विद्यार्थ्यांचा सहभाग

कोल्हापूर, ता. १४ : कोविड १९ संसर्गाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे विविध स्तरावर उपाययोजना सुरू आहेत. याअंतर्गत आज शहरातील नाले स्वच्छता व औषध फवारणी मोहीम आज राबविली. स्वच्छता मोहिमेत सहा टन कचरा व प्लास्टिक जमा झाले. आजच्या मोहिमेचा हा ५९ वा रविवार असून, या अभियानात महापौर निलोफर आजरेकर, स्वाती यवलुजे, सागर यवलुजे, स्वरा फौंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगावकर व कार्यकर्ते, हातकणंगले महिला, विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी व विद्यार्थिनी, स्वच्छता दूत अमित देशपांडे, पोलिस कर्मचारी व



कोल्हापूर : महापलिकेतर्फे रविवारी स्वच्छता राबविण्यात आली.

येथे स्वरा फौंडेशनतर्फे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी व नगरसेवक शेखर कुसाळे यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. यावेळी स्वरा फौंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगावकर, प्राजक्ता पंचगंगा नदी येथे महापालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी रणजित चिले व परवाना अधीक्षक राम काटकर यांच्या हस्ते वृक्षारोपण केले.

**येथे राबविली...**

ही स्वच्छता मोहीम हॉकी स्टेडियमनजीक जयंती नाला, रिलायन्स मॉल मागील बाजू, कसबा बावडा पोलिस लाईन संपूर्ण परिसर, जयंती पंपिंग स्टेशन, पंचगंगा नदी घाट, रंकाळा तलाव परिसर, हुतात्मा पार्क गार्डन, कदम खण व पंचगंगा स्मशानभूमी परिसर याठिकाणी राबविली. तसेच स्टार मार्केट खानविलकर पेट्रोल पंप ते राजहंस प्रिंटिंग प्रेस येथील चॅनेलमधील काढलेला गाळ उठाव केला. या मोहिमेत ५ जेसीबी, ६ डंपर, ६ आरसी गाड्या, १ पाण्याचा टँकर, १ टँकरद्वारे औषध फवारणी केली. महापालिकेच्या ६० स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या मदतीने मोहीम राबविली.

सकाळ

सोमवार,
६ जुलै २०२०

# महास्वच्छतेत पाच टन कचरा जमा

## ६२ व्या रविवारी मोहीम; विविध संस्था, संघटनांचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ५ : शहरात आज झालेल्या महास्वच्छता अभियानामध्ये पाच टन कचरा व प्लास्टिक जमा झाले. मोहिमेचा ६२ वा रविवार असून या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम सुरू आहे.**



कोल्हापूर : महापालिकेने शहरात सलग ६२ व्या रविवारी स्वच्छता मोहीम राबविली. यावेळी स्वच्छता करताना नागरिक.

आजच्या मोहिमेत नगरसेवक भूपाल शेटे, डी. वाय. पाटील स्कूल, बावडा, विवेकानंद कॉलेज विद्यार्थिनी मानसी कांबळे, सहायक आयुक्त चेतन कोंडे, अवधूत कुंभार, ज्येष्ठ नागरिक, स्वरा फौंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगावकर व कार्यकर्ते, आम आदमी अध्यक्ष संदीप देसाई, उपाध्यक्ष उत्तम पाटील, सूरज सर्वे, आदम शेख, महेश घोलपे, विशाल वाठारे, सचिन डाफळे, राज कोरगावकर, सुभाष यादव, बसाप्पा हदिमनी, सविराज पाटील, आनंदराव वणिरे, स्वच्छता दूत अमित देशपांडे, शेंडा पार्क परिसरातील भाजी विक्रेते यांनी भाग घेतला.

जयंती नदी संप व पंप हाऊस परिसर येथे राजर्षी शाहू इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, दसरा चौकतर्फे प्रतिनिधी महेश कामत यांनी २५ रोपे लावली. अतिरिक्त आयुक्त नितीन देसाई यांच्या हस्ते वृक्षारोपण केले.

शाहू उद्यान व धुण्याची चावी स्मृती उद्यान येथील परिसराची स्वच्छता करून येथे स्वरा फौंडेशनतर्फे नगरसेवक शेखर कुसाळे व प्रतापसिंह जाधव यांच्या हस्ते वृक्षारोपण झाले. अध्यक्ष प्रमोद माजगावकर, महिला अध्यक्ष सविता पाडळकर, उपाध्यक्ष अमृता वास्कर, करवीर अध्यक्ष नागेश कुंभार, अपूर्वा खांडेकर, प्रणव कागले, नेहा कौदाडे, पीयूष हुलस्वार, पिंटू संकपाळ, सरफराज मिद्या, धर्मराज पडळकर, आदित्य पाटील, संतोष पाटील, रेणू कोकाटे, ऐश्वर्या मोरे उपस्थित होते.

हॉकी स्टेडियम ते गोखले कॉलेज मेनरोड, पंचगंगा नदी घाट, पंचगंगा स्मशानभूमी ते सिध्दार्थ नगर, जयंती नदी संप व पंप हाऊस परिसर, रंकाळा तलाव पद्माराजे उद्यान मेन रोड, रिलायन्स मॉल मागील बाजू जयंती नदी, शिये नाका मेनरोड तसेच राजकपूर पुतळा ते रंकाळा इराणी खाण, शेंडा पार्क येथे स्वच्छता केली.

### झूम प्रकल्प परिसरात वृक्षारोपण

गुरुपौर्णिमेनिमित्त निसर्गालाच गुरू मानून कसबा बावडा झूम प्रकल्प परिसरात हवा शुद्ध ठेवणारी, विषारी वायू शोषून घेणारी १५ ते २० फुटी झाडांचे वृक्षप्रेमी वेल्फेअर ऑर्गनायझेशन संस्थेकडून वृक्षारोपण केले. यात महारुख, तामण, पुत्रंजीवी, सातवीन, कडूलिंब, जांभूळ, वड, पिंपळ, हेळा, सोनचाफा, बिट्टी, मोर आवळा, करंज, बेल अशा देशी झाडांचा समावेश होता. यावेळी वृक्षप्रेमी संस्थेचे अध्यक्ष अमोल बुड्डे, वृक्षप्रेमी संस्थेचे सदस्य, पशुवैद्यकीय अधिकारी विजय पाटील, विभागीय आरोग्य निरीक्षक निखिल पाडळकर, सतीश कोरडे, तन्वी भोसले, परितोष उरकुडे, सचिन पोवार, विकास कोंडेकर व नागरिकांचा सहभाग होता.

सकाळ सोमवार, १० फेब्रुवारी २०२०

# महास्वच्छतेत आठ टन कचरा जमा

## शहरात ४१ व्या रविवारी मोहीम; नागरिक, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग

**कोल्हापूर, ता. ९ :** शहरात आज झालेल्या महास्वच्छता अभियानात आठ टन कचरा व प्लास्टिक जमा झाले. आजच्या मोहिमेचा ४१ वा रविवार होता. अभियानात शहरातील ज्येष्ठ नागरिक, विवेकानंद आणि राजाराम महाविद्यालयांचे राष्ट्रीय सेवा योजनेचे छात्र, वृक्षप्रेमी, स्वयंसेवी संस्था व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.



कोल्हापूर : शहरात रविवारी महापालिकेतर्फे विविध ठिकाणी राबविण्यात आलेली स्वच्छता मोहीम.

या वेळी गांधी मैदान, पंचगंगा नदी घाट, रियालन्स मॉल पिछाडीस, हुतात्मा पार्क, दसरा चौक ते खानविलकर पेट्रोलपंप व माळकर तिकटी ते छत्रपती शिवाजी मार्केट, टेंबलाईवाडी उड्डाण ते लोणार वसाहत मेनरोड, कोटितीर्थ तलाव, लक्ष्मीबाई जरग विद्यामंदिर परिसर तसेच कळंबा तलाव परिसराचीही स्वच्छता करण्यात आली. मोहिमेत चार जेसीबी, सात डंपर, सहा आरसी गाड्या व स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सहायनि ही स्वच्छता मोहीम राबविली. या वेळी पंचगंगा घाटाची येथे प्लास्टिक बंदी, ओला सुका कचरा वर्गीकरण, पाण्याची बचत बाबत जनजागृती फलक हातात घेऊन जनजागृती केली. एनसीसी विद्यार्थ्यांतर्फे सर्व पुतळ्यांची स्वच्छता केली. महात्मा गांधी मैदान येथे माजी नगरसेवक रवीकिरण इंगवले, वृक्षप्रेमी स्वंयसेवी संस्था, लहान मुले, खेळाडू व नागरिकांना आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी स्वच्छतेची शपथ देऊन मोहिमेस प्रारंभ केला.

या वेळी मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, शाखा अभियंता आर.के.पाटील, महाराष्ट्र अर्टि बॅटरीचे कमांडिंग ऑफिसर कर्नर संजीव सरनाईक, सुभेदार मेजर मुकेश कुमार, एनएनसीसीचे २०० छात्रांनी, वर्कशॉपप्रमुख सचिन जाधव, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, राजाराम विद्यालयाचे एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट डॉ. बिटे, महावीरचे एनसीसीचे ऑफिसर लेफ्टनंट उमेश वांगदरे आदींनी सहभाग घेतला.

### प्रबोधनाबाबत बैठक घेणार : आयुक्त डॉ. कलशेट्टी

आयुक्त डॉ. कलशेट्टी म्हणाले, की स्वच्छता मोहिमेचा ४१ वा रविवार आहे. सर्वांनी विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून प्रबोधन करून तरुण पिढीला व्यसनाधिनतेपासून लांब ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यांना अशा कृत्याबाबत कारवाईची जाणीव करून द्यावी. कोल्हापूर शहर १ मार्चपर्यंत प्लास्टिकमुक्त झाले पाहिजे, यासाठी सर्व निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, रुग्णालयेही प्लास्टिकमुक्त करणार आहोत. शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी, पालक यांची एकत्रितपणे बैठक आयोजित करून त्यांच्यात प्लास्टिकबाबत जनजागृती करण्यात येईल. गर्दीच्या ठिकाणी मानवी साखळीद्वारे प्लास्टिक बंदी, ओला व सुका कचरा वर्गीकरण, पाणी बचतीबाबत जनजागृतीचे फलक हातात घेऊन प्रबोधन करणार आहोत.

सकाळ
सोमवार, २४ फेब्रुवारी २०२०

# महास्वच्छता अभियानात आठ टन कचरा, प्लास्टिक जमा

## त्रेचाळिसावा रविवार : शहरात विविध ठिकाणी राबवली मोहीम

कोल्हापूर, ता. २३ : शहरामध्ये आज झालेल्या महास्वच्छता अभियानामध्ये आठ टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. या मोहिमेचा हा त्रेचाळिसावा रविवार होता. या अभियानामध्ये शहरातील ज्येष्ठ नागरिक, स्वरा फाउंडेशन कार्यकर्ते, स्वच्छतादूत अमित देशपांडे, विवेकानंद कॉलेजचे एन.एस.एस.चे विद्यार्थी, वृक्षप्रेमी, स्वयंसेवी संस्था व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. ही मोहीम आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. संप आणि पंप हौस येथे संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन आजच्या स्वच्छता मोहिमेची सुरवात करण्यात आली. यावेळी याठिकाणी स्वरा फौंडेशनच्यावतीने वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी गांधी मैदान, पंचगंगा नदी घाट, रिलायन्स मॉल संपूर्ण परिसर, दसरा चौक ते खानविलकर पेट्रोलपंप व माळकर तिकटी ते छत्रपती शिवाजी मार्केट, हुतात्मा पार्क, टेंबलाईवाडी उड्डान ते लोणार वसाहत मेनरोड तसेच कळंबा तलाव या परीसराचीही स्वच्छता या मोहिमेत करण्यात आली. या मोहिमेत ४ जेसीबी, ६ डंपर, ६ आरसी गाड्या व महापालिकेच्या १२० स्वच्छता कर्मचा-यांच्या सहाय्याने ही स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.

तसेच संत निरंकारी चॅरिटेबल फौंडेशनच्या वतीने बाबा हरदेव सिंहजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त परिसरात वृक्षारोपण करुन सावित्रीबाई फुले रुग्णालय परिसराची स्वच्छता करण्यात आली.

आरोग्यधिकारी डॉ. दिलीप पाटील, शाखा अभियंता आर. के. पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर, माजी नगरसेवक मधुकर रामाणे, कळंबा ग्रामपंचायचे सरपंच सागर भोगम, पाचगाव सरपंच संग्राम पाटील, क्रेडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर, दिलीप देसाई, प्रा. सौ. स्मिता गिरी, विवेकानंद कॉलेज एन.एस.एस.चे विद्यार्थी, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर यांनी सहभाग नोंदविला.

तरुण भारत ▪सोमवार, २ मार्च २०२०

# महास्वच्छता अभियानात ६ टन कचरा उठाव

## शहरात स्वच्छता मोहिमेचा ४४ वा रविवार : विविध सामाजिक संस्थांचा सहभाग

प्रतिनिधी
कोल्हापूर

महानगरपालिकेचे आयुक्त डॉ मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या पुढाकाराने शहरामध्ये १ मार्च रोजी झालेल्या महास्वच्छता अभियानामध्ये ६ टन कचरा व प्लास्टिक गोळा करण्यात आले. स्वच्छता मोहिमेचा हा ४४ वा रविवार होता. आयुक्तांच्या आव्हानास प्रतिसाद देत स्वरा फौंडेशनचे कार्यकर्ते, स्वच्छता दूत अमित देशपांडे, विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी, वृक्षप्रेमी ऑर्गनायझेशन संस्था, धर्मादिकारी प्रतिष्ठान संस्थेचे कार्यकर्ते व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी या स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला.

सीपीआर येथे वृक्षप्रेमी आर्गनायझेशन संस्थेचे कार्यकर्ते व नागरिकांना आयुक्तांनी स्वच्छतेची शपथ दिल्यानंतर स्वच्छता मोहिमेला प्रारंभ झाला. वृक्षप्रेमी आर्गनायझेशन संस्थेकडून पर्यावरण पूरक संदेश देणाऱ्या पाणपोईचे अनावरण आयुक्त कलशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले. आर्गनायझेशन संस्थेकडून अविरत जलसेवा देण्याचे या संस्थेचे ११ वे वर्ष असून आयुक्तांनी त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. या संस्थेने पंचगंगा नदी घाट परिसरातील १८० झाडांना पाणी घातले. तसेच या परिसराची साफसफाई केली.



**कोल्हापूर : सलग ४४ व्या रविवारी स्वच्छता मोहिम राबवताना सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते.**

स्वच्छता मोहिमेत गांधी मैदान, पंचगंगा नदी घाट, रियालन्स मॉल परिसर, जयंती नदी पंपींग स्टेशन, हुतात्मा पार्क, डायाना पार्क येथील स्वच्छता करण्यात आली. मोहिमेत ५ जेसीबी, ६ डंपर, ६ आरसी वाहणे, टॅक्टर व महापालिकेचे ७० कर्मचारी सहभागी होते. यावेळी आरोग्यधिकारी डॉ. दिलीप पाटील, शाखा अभियंता आर. के. पाटील, मुख्य आरोग्य निरिक्षक जयंवत पोवार, विभागीय आरोग्य निरीक्षक राहुल राजगोळकर उपस्थित होते.

तरुण भारत
सोमवार, १३ जानेवारी २०२०

# राजर्षी शाहू समाधी स्थळाची स्वच्छता



कोल्हापूर : महास्वच्छता अभियानांतर्गत नर्सरी बागेतील राजर्षी छत्रपती शाहू समाधी स्थळाची रविवारी स्वच्छता करण्यात आली.

प्रतिनिधी
कोल्हापूर

- महास्वच्छता अभियानाचा ३७ वा रविवार
- सामाजिक संस्था, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांचा सहभाग

महास्वच्छता अभियानातंर्गत रविवारी नर्सरी बागेतील राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळ परिसराची स्वच्छता करण्यात आली. याप्रसंगी आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांनी शहरावासियांनी महिन्यातून एकदा मोहिमेत सहभागी व्हावे, प्लास्टीकचा वापर टाळावा, तसेच इतरांनाही वापर करण्यापासून रोखाव, असे आवाहन केले.

शहरामध्ये आयुक्त डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली दररविवारी स्वच्छता मोहिम आयोजित केली जाते. आजच्या ३७व्या रविवारी नर्सरी बागेतील शाहू समाधी स्थळासह रंकाळा तलाव परिसरातील शाहू स्मृती उद्यान, आयासोलेशन हॉस्पीटल ते शेंडा पार्क, रिलायन्स मॉलच्या पिछाडीस, डायना पार्क, गायकवाड वाडा, शिर्के उद्यान, रेल्वे गुडस्, कोटीतीर्थ तलाव, हुतात्मा पार्क आदी परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. तसेच दसरा चौक ते खानविलकर पेट्रोल पंप, रंकाळा टॉवर ते फुलेवाडी फायर स्टेशन, तंत्रज्ञान विभाग शिवाजी विद्यापीठ, टेंबलाईवाडी उड्डाण पुल ते कावळा नाका, तावडे हॉटेल, कळंबा फिल्टर हाऊस, पापाची तिकटी ते गंगावेश रोड आदी रस्त्यांचीही सफाई करण्यात आली.

मोहिमेत शिवाजी विद्यापीठ, विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी, वृक्ष प्रेमी संघटना, स्वरा फौंडेशन, शहर परिट समाज, मेनन कंपनीचे कर्मचारी, महापालिकेचे सफाई कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला. चार जेसीबी, पाच डंपर, सहा आरसी वाहने, १४० स्वच्छता कर्मचारी यांच्या सहाय्याने मोहिम पूर्ण करण्यात आली.

मोहिमे दरम्यान नगरसेविका सुरेखा शहा, माजी नगरसेवक श्रीकांत बनछोडे, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पोवार, शाखा अभियंता आर. के. पाटील, अमित देशापांडे, बाबा साळोखे, क्रीडा निरीक्षक सचिन पांडव, शशीकांत भालकर, अदिल्य लातूरकर, प्रशांत शेंडे, विनायक भाट, प्रेम सातपुते आदी उपस्थित होते.

तरुण भारत सोमवार, १५ जून २०२०

# शहरातून ६ टन कचऱ्याचा उठाव

## स्वच्छता अभियानाचा सलग ५९ वा रविवार : विविध ठिकाणी वृक्षारोपणाचा उपक्रम उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

महापालिकेच्या वतीने प्रत्येक रविवारी शहरात स्वच्छता अभियान राबवण्यात येत आहे.आज रविवारी स्वच्छता अभियान राबवत सुमारे ६ टन कचरा व प्लॅस्टिक जमा करण्यात आले. आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवण्यात येत आहे.

महापालिकेच्या वतीने गेल्या वर्षभरापासून स्वच्छता मोहीम आणि नालेसफाई करण्यात येत आहे. या अभियानात संस्था,तरुण मंडळांचाही प्रतिसाद मिळत आहे.रविवारी स्वच्छता अभियानामध्ये ६ टन कचरा व प्लॅस्टिक गोळा करण्यात आले. हॉकी स्टेडियम नजीक जयंती नाला, रिलायन्स मॉल मागील बाजू कसबा बावडा पोलिस लाईन परिसर, जयंती पंपीग स्टेशन, पंचगंगा नदी घाट, रंकाळा तलाव परिसर, हुतात्मा पार्क गार्डन, कदमखण व पंचगंगा स्मशानभूमी परिसर याठिकाणी मोहीम राबविण्यात आली. तसेच स्टार मार्केट खानविलकर पेट्रोल पंप ते राजहंस प्रिंटींग प्रेस येथील चॅनेल मधील काढण्यात आलेल्या गाळाचा उठाव करण्यात आला. या मोहिमेत ५ जेसीबी, ६ डंपर, ६ आरसी गाडया, १ पाण्याचा टँकरचा समावेश होता. टँकरद्वारे कसबा बावडा परिसरात औषध फवारणी करण्यात आली.महापालिकेच्या ६० स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने ही मोहिम पार पडली. महापौर निलोफर आजरेकर, माजी महापौर स्वाती यवलूजे, सागर यवलूजे, स्वरा फौंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगांवकर व कार्यकर्ते, हातकणंगले महिला, विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी व विद्यार्थीनी, स्वच्छता दूत अमित देशपांडे, पोलीस कर्मचारी व महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी सोशल डिस्टंस ठेवून स्वच्छता मोहिमेत सहभाग नोंदविला.



कोल्हापूर : स्वच्छता अभियाना अंतर्गत पदपथांची स्वच्छता करंण्यात आली.

रुईकर कॉलनी मैदान येथे देशी झाडांचे वृक्षप्रेमी वेल्फेअर ऑर्गनायझेशन संस्थेकडून वृक्षारोपन करण्यात आले. कडुनिंब, पायर, औंदुबर, कदंब, जांभूळ, हेळा, सोनचाफा, बिट्टी, पिंपळ, मोर आवळा, करंज, बेल अशा देशी झाडांची लागवड करण्यात आली. संभाजी महाराज मंदिर पंचगंगा नदी येथे मुख्य अग्निशमन अधिकारी रणजित चिले व परवाना अधिक्षक राम काटकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी हातकणंगले महिला अध्यक्ष अपूर्वा खांडेकर, रेणूका कोकाटे, प्रणव कागले व स्वरा फौंडेशनचे सदस्य उपस्थित होते.

### चला वृक्षारोपण करुया......

छ.शाहू उद्यानात स्वरा फौंडेशनच्या वतीने आयुक्त डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी व नगरसेवक शेखर कुसाळे यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. यावेळी स्वरा फौंडेशनचे अध्यक्ष प्रमोद माजगांवकर, प्राजक्ता माजगावकर, स्वरा फौंडेशनचे महिला अध्यक्ष सविता पाडळकर, अमृता वास्कर, अजिक्य पाटील, सुरेखा पाडळकर, सरफराज शेख, पियुष पाटील, बबन वडणगेकर उपस्थित होते.

तरुण भारत शुक्रवार, २४ जानेवारी २०२०

# रक्तदान शिबिरात ७६ रक्तदात्यांनी केले रक्तदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून विवेकानंद कॉलेजमधील एन. सी. सी., एन. एन. एस विभाग आणि सीपीआर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबीरात ७६ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे स्वागत केले. यावेळी संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. युवराज भोसले, प्राचार्य डॉ. एस. एम. मणेर, प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्रा. डी. बी. पाटील, जिमखाना प्रमुख प्रा. किरण पाटील, कला व वाणिज्य शाखेच्या अधिष्ठाता डॉ. श्रुती जोशी उपस्थित होते.

रक्तदान शिबीरासाठी एनएसएस प्रमुख प्रा. एच. पी. पाटील, एनसीसी प्रमुख कॅप्टन सुनिता भोसले, प्रा. संदीप पाटील, प्रा. पी. आर. बागडे सहित एनसीसी व एनएसएस यांनी विशेष परिश्रम घेतले.

या शिबीरासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. शितल हरूगडे, डॉ. अर्पित, अधिपरिचारक दत्ता ऐवळे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ रमेश सावंत, राजू नडगिरे, सहायक रोहित गोरे, हर्षवर्धन पटवर्धन, प्रणित मिसाळ, मिनल पाटील, समुपदेशक सुरेखा माने यांचे सहकार्य लाभले.